सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# सांस्कृतिक कार्य संचालनालय
# भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजनेंतर्गत
# युवा शिष्यवृत्ती योजना

---

भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजनेंतर्गत युवा शिष्यवृत्ती योजना या योजनेंतर्गत शास्त्रीय संगीतामध्ये (वादन व गायन) शिक्षण घेणा-या हुशार व गरजू विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देऊन त्यांच्या कलेच्या शिक्षणात मदत करण्यासाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. शिष्यवृत्ती प्रतिमाह रु. ५०००/- याप्रमाणे दोन वर्षे असेल.

या शिष्यवृत्तीसाठी पात्रतेच्या अटी व शर्ती तसेच विहित नमुन्यातील अर्ज www.mahasanskruti.org या वेबसाईटवर **नवीन संदेश** या मथळयाखाली भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजनेंतर्गत युवा शिष्यवृत्ती योजना या शीर्षाखाली कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील. शास्त्रीय संगीतातील निकष पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अर्ज दि. ५ ऑगस्ट, २०२३ ते ३ सप्टेंबर, २०२३ या कालावधीत कार्यालयीन वेळेत उपलब्ध असून भरलेले अर्ज त्याच कालावधीत कार्यालयीन वेळेत संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय, विस्तार भवन, पहिला मजला, महात्मा गांधी मार्ग, मुंबई - ३२ या पत्त्यावर स्विकारले जातील. त्यानंतर प्राप्त अर्जांचा शिष्यवृत्तीसाठी विचार होणार नाही.

**सही/-**

**संचालक, सांस्कृतिक कार्य**

## सांस्कृतिक कार्य संचालनालय

## भारतरत्न पं. भीमसेन जोशी युवा शिष्यवृत्ती योजना

या योजनेंतर्गत पात्रतेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१) विद्यार्थ्याचे वय कमाल २५ वर्षे इतके असावे.

२) विद्यार्थ्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

३) केंद्र शासनाची किंवा इतर संस्थेची शास्त्रीय संगीताच्या शिक्षणास्तव शिष्यवृत्ती मिळत असल्यास विद्यार्थी या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र असणार नाही.

४) शासनामार्फत गठित तज्ज्ञ समितीमार्फत प्राप्त अर्जाची छाननी करुन करुन प्रतिवर्षी गुणवत्तेनुसार १२ गरजू विद्यार्थ्याची (६ गायन व ६ वादन क्षेत्रातील) शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात येईल. समितीचा निर्णय अंतिम राहील.

५) निवड झालेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती प्रतिमाह रु.५०००/- याप्रमाणे दोन वर्षे देण्यात येईल.

६) गुरुकडे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी गुरुकडे किमान १० वर्षे शिक्षण घेत असल्याचे गुरुचे शिफारस-पत्र जोडावे.

# अर्जाचा नमुना

१.विद्यार्थ्याचे नाव :------------------------------------------------------------------------------------------

२.विद्यार्थ्याचा पत्ता/दूरध्वनी /मोबाईल क्र. :------------------------------------------------------------------

३.विद्यार्थ्याचा पासपोर्ट साईज फोटो:------------------------------------------------------------------------

४.शास्त्रीय संगीतातील शिक्षणाचा प्रकार :----------------------------------------------------------------

५.शास्त्रीय संगीताच्या सादरीकरणाची सी.डी:---------------------------------------------------------------

६.जन्मतारीख व अर्जाच्या दिनांकास असलेले वय:----------------------------------------------------------

(सोबत जन्मतारखेच्या दाखल्याची साक्षांकित प्रत:-----------------------------------------------------------

७.तहसीलदार कार्यालयाचा कुटुंबाचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला:------------------------------------------

८.विद्यार्थ्यास अपंगत्व असल्यास त्याबाबतचे जिल्हा शल्य चिकित्सक यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र

------------------------------------------------------------------------------------------------------------------

९. केंद्र शासन किंवा अन्य खाजगी संस्थांची शास्त्रीय संगीताच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळत असल्यास त्याबाबतच्या आदेशाच्या प्रती-----------------------------------------------------------------------

१०.गुरुकडे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी गुरुकडे किमान १० वर्षे शिक्षण घेत असल्याचे गुरुचे शिफारस-पत्र जोडावे. ------------------------------------------------------------------------------------------

११.विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाची गुणपत्रिका.

------------------------------------------------------------------------------------------------------------------

**मी असे प्रमाणित करतो / करते की, मी वर दिलेली माहिती सत्य व बिनचूक असून सदरची माहिती चुकीची आढळल्यास मी कार्यवाहीस पात्र असल्याची मला जाणीव आहे.**

**विद्यार्थ्याची स्वाक्षरी**

**स्थळ:**
**दिनांक:**